जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक २१.०८.२०२६**

## ''वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या एक महिला वेश्या दलाल आरोपीस गुन्हे शाखेकडुन अटक''

ठाणे शहराच्या **''बर्गर किंग हॉटेल, लेकसिटी मॉल, कापुरबावडी नाका, घोडबंदर रोड, ठाणे पश्चिम''** या ठिकाणी एक महिला वेश्या दलाल काही पिडीत व असहाय्य मुलींना फुस लावून वेश्यागमनासाठी बोलवणार आहे अशी गुप्त माहिती, गुप्त माहितीदारामार्फत ठाणे गुन्हे शाखेच्या अंतर्गत असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वपोनिरी/अंजली आंधळे यांना मिळाली होती.

त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर या शाखेने **दिनांक २०/०८/२०२६ रोजी १४.४५ वाजता ''बर्गर किंग हॉटेल, लेकसिटी मॉल, कापुरबावडी नाका, घोडबंदर रोड, ठाणे पश्चिम''** या ठिकाणी सापळा लावून एक महिला वेश्या दलाल आरोपीस १४:४५ वाजता ताब्यात घेवून लागलीच अटक करून तीचे तावडीतून ०४ पिडीत मुलींची सुटका करण्यात आली आहे. सदर महिला वेश्या दलाल आरोपी हिचे विरुध्द **कापुरबावडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे दिनांक २०/०८/२०२६ रोजी २३:५५ वा. गुन्हा रजि.नंबर ४०२/२०२६ भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १४३ (१), १४३ (३) सह स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे** गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच ०४ पिडीत बळीत मुलींना सुरक्षिततेच्या दृष्टीने सुधारगृहमध्ये ठेवण्यात आले आहे.

सदर कारवाई ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे तसेच श्री.मदन बल्लाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वपोनि/अंजली आंधळे, मसपोनि/स्नेहल शिंदे, मपोउपनि/दिक्षा ढाकरे, सपोउपनि/व्ही.आर.पाटील, पोहवा/ व्ही.जी.नाईक, डी.पी.महाले, आर.यु.सुवारे, एस.आर.पाटील, मपोना/एस.के.कोल्हे, मपोअं/ एच. आर.थोरात, चापोअंम/व्ही.के.निकम यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे